आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक २३ फेब्रुवारी २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. अंतराळ क्षेत्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातला युवकांचा वाढता सहभाग नव्या क्रांतीला जन्म देत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात' या कार्यक्रमात प्रतिपादन.

2. अमरावती विद्यापीठाने रोजगारक्षम विद्यार्थी घडवावेत, राज्यपालांचं संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४१व्या दीक्षांत समारंभात आवाहन.

3. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 3 मार्चपासून मुंबईत सुरू.

4. आयसीसी अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताची पाकिस्तानशी लढत.

<u>मन की बात</u>

अंतराळ क्षेत्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातला भारतीय युवकांचा वाढता सहभाग नव्या क्रांतीला जन्म देत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधानांनी आकाशवाणीवर 'मन की बात' या कार्यक्रमाच्या माध्यमातून आज जनतेशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा ११९वा भाग होता. नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारून त्याचा अवलंब करण्यात भारतातील लोक कोणापेक्षाही मागे नसल्याचं ते म्हणाले. गेल्याच महिन्यात इस्रोचं शंभरावं रॉकेट प्रक्षेपण झाल्याचंही पंतप्रधानांनी सांगितलं.

<u>*हमारी space journey की शुरुआत बहुत ही सामान्य तरीके से हुई थी | इसमें कदम-कदम पर चुनौतियाँ थीं, लेकिन हमारे वैज्ञानिक, विजय प्राप्त करते हुए, आगे बढ़ते ही गए | समय के साथ अंतरिक्ष की इस उड़ान में हमारी सफलताओं की list काफी लंबी होती चली गई | Launch vehicle का निर्माण हो, चंद्रयान की सफलता हो, मंगलयान हो, आदित्य L-1 या फिर एक ही rocket से, एक ही बार में, 104 satellites को space में भेजने का अभूतपूर्व mission हो |*</u>

आता आपल्या अंतराळ शास्त्रज्ञांच्या पथकांमध्ये महिलांचा सहभाग वाढत असल्याची बाब त्यांनी नमूद केली. देशाचा युवा वर्ग अंतराळ क्षेत्राकडे वळू लागला असून, त्यामुळेच गेल्या काही वर्षांत या क्षेत्राशी संबंधित स्टार्ट-अप आणि खासगी क्षेत्रातल्या अंतराळ कंपन्यांची संख्या शेकडोच्या घरात पोहचली असल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या काही दिवसांमध्ये

आपण राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणार असल्याचं स्मरण करून देताना त्यांनी आपल्या मुलांना विज्ञानाची आवड असणं गरजेचं असल्याचं सांगितलं. यादृष्टीनं त्यांनी 'वैज्ञानिक म्हणून एक दिवस' ही कल्पना मांडली. नागरिकांनी आपल्या सोयीचा दिवस निवडून त्या दिवशी एक शास्त्रज्ञ, एक वैज्ञानिक म्हणून जगून पाहावं, संशोधन प्रयोगशाळा, तारांगणं किंवा अंतराळ संशोधन केंद्रांना भेट द्यावी, असं आवाहन त्यांनी केलं. आजच्या मन की बातमध्ये प्रधानमंत्र्यांनी उत्तराखंडमध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील यशवंतांचं अभिनंदन केलं. यावेळी त्यांनी इतर पदक विजेत्यांसह महाराष्ट्रातील किरण म्हात्रे आणि तेजस शिरसे या खेळाडूंचा उल्लेख केला. एक तंदुरुस्त आणि निरोगी राष्ट्र बनण्यासाठी भारताला लठ्ठपणाच्या समस्येवरही मात करावी लागेल, असं पंतप्रधान म्हणाले. ही समस्या वाढत असल्याची आकडेवारी गंभीर असून, आपण एकत्रितपणे छोट्या -छोट्या प्रयत्नांतून याचा सामना करायला हवा असं ते म्हणाले.

*अधिक वजन या मोटापा कई तरह की परेशानियों को, बीमारियों को भी जन्म देता है | हम सब मिलकर छोटे-छोटे प्रयासों से इस चुनौती से निपट सकते हैं, जैसे एक तरीका मैंने सुझाया था, "खाने के तेल में दस पर्सेन्ट (10%) की कमी करना" |*

लठ्ठपणाच्या समस्येचं गांभीर्य आणि त्यावर मात करण्यासाठी ऑलिंपिक पदक विजेता नीरज चोप्रा, क्रीडापटू निखत जरीन तसंच डॉ.देवी शेट्टी यांचे मार्गदर्शनपर संदेशही पंतप्रधानानी श्रोत्यांना ऐकवले. पुढच्या महिन्यात ८ मार्च रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणजे आपल्या महिला शक्तीला वंदन करण्याची विशेष संधी असल्याचं ते म्हणाले. यंदाच्या महिला दिनानिमीत्त ८ मार्च रोजी, एका दिवसासाठी आपण आपली समाजमाध्यम खाती देशातल्या काही प्रेरणादायी महिलांकडे सोपवणार आहोत. या खात्यांवर त्या त्यांचं काम, त्यांच्या समोरची आव्हानं, अनुभव देशवासियांसोबत सामायिक करतील, असं ते म्हणाले. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी महिलांनी यासाठी नमो **ॲ**पवर तयार केलेल्या मंचाच्या माध्यमातून सहभागी होण्याचं आवाहन त्यांनी केलं. देशात इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू असल्याचा उल्लेखही प्रधानमंत्र्यांनी केला. याच पार्श्वभूमीवर दरवर्षी होणाऱ्या परीक्षा पे चर्चा हा उपक्रम यंदा वेगळंपणानं आयोजित केला गेला आणि त्याबद्दल सकारात्मक अभिप्राय मिळत आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. परीक्षा देत असलेल्या विद्यार्थीनी आनंदी आणि तणावमुक्त राहावं, असा सल्ला प्रधानमंत्र्यांनी यावेळी दिला.

अमरावती विद्यापीठ दीक्षांत समारंभ

कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा अशा प्रगत क्षेत्रात शिक्षण देऊन अमरावती विद्यापीठाने रोजगारक्षम विद्यार्थी घडवावेत, असं आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल आणि कुलपती सी.पी.राधाकृष्णन यांनी आज केलं. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ४१व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. संस्कृत, पाली, इंग्रजी, हिंदी आणि भारतातील इतर भाषांमध्ये साठवलेले ज्ञान मराठीत भाषांतरित व्हावं, जेणेकरून सामान्य माणसाला त्याचा फायदा होईल, असं आवाहनही यावेळी राधाकृष्णन यांनी केलं. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, कुलगुरू डॉ.मिलींद बारहाते आदी उपस्थित होते. न्यायमुर्ती गवई यांनी संत गाडगे बाबांच्या जयंतीचे औचित्य साधून अमराती जिल्ह्याला संतांची महान परंपरा लाभली असल्याचे सांगुन अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले. यावेळी न्यायमुर्ती गवई यांनी या विद्यापीठाची वैशिष्ट्येही सांगितले.

*महाराष्ट्र स्थापना दिनी 1 मे रोजी विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर या विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून माझ्या वडिलांचे मित्र स्वर्गवासी डॉ.के.जी. देशमुख यांनी धुरा सांभाळली. या परिसरात शून्यामधून विश्व उभारण्यात आले. या परिसरात क्रीडांगण तयार करण्यात आली. जलकुंभाची निर्मिती रस्ते रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात आली. आजमितीस परिसरामध्ये सुमारे तीन लक्ष्याच्यावर झाडे आहेत. अमरावती शहरात ऑक्सिजन पार्क म्हणून विद्यापीठ परिसराचा नावलौकिक आहे.*

यावेळी राज्यपाल यांच्या हस्ते मुलींच्या वसतीगृह आणि विस्तारीत इमारतीचे आभासी पद्धतीने भूमिपूजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. बारहाते यांनी स्वागतपर भाषण केले. तसेच अहवालाचे वाचन केले. सुरवातीला राज्यपाल यांना राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

संत गाडगेबाबा जयंती

संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज त्यांच्या शासकीय निवासस्थानी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मंत्रालयातील तळमजल्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पहार अर्पण करुन संत गाडगेबाबांना अभिवादन केले. यावेळी मंत्रालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. संत गाडगेबाबांचे अंतिम श्रद्धास्थान असलेल्या अमरावतीच्या दर्यापूर

तालुक्यातील श्रीक्षेत्र नागरवाडी इथं त्यांच्या पावन स्मृतीस अभिवादन करण्यासाठी भव्य शोभायात्रेचे आयोजन, करयात आले  होते.

<u>अर्थसंकल्पीय अधिवेशन</u>

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबई येथे सोमवार दि. 3 मार्च ते बुधवार दि. 26 मार्च या कालावधीत होणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प 10 मार्च रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येणार आहे. विधानभवन मुंबई इथं विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक आज झाली. यावेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

<u>आयसीसी क्रिकेट</u>

आयसीसी अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना पाकिस्तानशी होत आहे. पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलंल्या तेव्हा पाकिस्तानच्या 43 शतकात 7 गडी बाद 200 धावा झाल्या होत्या.पाकिस्तान संघाकडून सौD शकील यांनी 62 धावा तर मोहम्मद रिजवान यांनी 43 धावा काढल्या अक्सर पटेल कुलदीप यादव आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी  एक गडी तर हार्दिक पंड्या यांनी दोन गडी बाद केले. स्पर्धेच्या सुरुवातीच्या सामन्यात भारताने बांगलादेशावर सहा गडी राखून दणदणीत  विजय  मिळवला होता. तर पाकिस्तानला कराची इथं झालेल्या सामन्यात न्यूझिलंडकडून ६० धावांनी पराभव स्वीकारला होता. आजचा सामना जिंकला, तर भारताचं उपांत्य सामन्यातलं स्थान निश्चित होईल.

<u>शिष्टमंडळ</u>

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवण्यासाठीच्या प्रस्तावाच्या सादरीकरणासाठी महाराष्ट्र राज्य सरकारचं चार सदस्यीय शिष्टमंडळ आज पॅरिसला रवाना झालं. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या नेतृत्वाखालच्या या शिष्टमंडळात अपर मुख्य सचिव विकास खारगे, पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी आणि वास्तुविशारद शिखा जैन यांचा समावेश आहे.

## पाणलोट विकास यात्रा

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत पाणलोट विकास यात्रेला अकोला जिल्ह्यात आजपासून सुरुवात होत आहे. येत्या २८ फेब्रुवारीपर्यंत अकोला जिल्ह्यातील बारा गावांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येईल. पुढील आठवडाभरात पाणलोट रथाचे स्वागत करणे, नवीन कामांचे भूमिपूजन करणे, वृक्ष लागवड करणे, पूर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करणे, पाणलोट योद्धांना बक्षीस देणे, पथनाट्याद्वारे पाणलोट व्यवस्थापनाचे महत्त्व सांगणे, मृद आणि जलसंधारणाची शपथ आदी कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर यांनी दिली.

## हवामान

हवामान! आज विदर्भात सर्वात जास्त तापमानाची नोंद अकोला येथे 36 पूर्णांक 7 अंश सेल्सिअस करण्यात आली असून, सर्वात कमी तापमान गोंदिया येथे 15 अंश सेल्सियस होते. नागपूरचा आजचा कमाल तापमान 34 पूर्णांक 6 अंश सेल्सियस तर किमान तापमान 15 पूर्णांक 4 अंश सेल्सियस होते. दरम्यान विदर्भातील सर्वच जिल्ह्यात हवामान कोरडे राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवला आहे.

*****